


॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५७ वा ❑ भारतीय सौर दिनांक १८ चैत्र शके १९४८, बुधवार दि.०८ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूगिरी चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राला फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचा वारसा असतानाही, अलिकडच्या काळात राज्यात वाढलेली भोंदूगिरी आणि अंधश्रद्धा अत्यंत चिंताजनक आहे. विशेषतः नाशिकमधील अशोक खरात प्रकरणामुळे हा विषय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांवर आधारलेला महाराष्ट्र म्हणजे पुरोगामी महाराष्ट्र होय. हा महाराष्ट्र जात, धर्म, लिंगभेद नष्ट करून सामाजिक समता, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाचा पुरस्कार करतो. फुले-शाहूंचा वारसा महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी आणि सुधारणावादी संस्कृतीची ओळख सांगतो.

जातिभेद आणि अंधश्रद्धेवर कडाडून टीका करत, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न फुले-डॉ आंबेडकरांनी केला.

जरी महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा वारसा सांगत असला, तरी आजही समाजात हुंडाबळी, बुवाबाजी, महिलांवरील अत्याचार आणि जातीवर आधारित हिंसाचार (उदा. ऑनर किलिंग) यांसारखे प्रकार घडतात, जे या पुरोगामी प्रतिमेला छेद देतात.

नुकत्याच समोर आलेल्या अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले आहे. या प्रकरणात पीडितांची एचआयव्ही चाचणी करण्याची मागणी विधानसभेत विरोधी पक्षनेत्यांकडून करण्यात आली, जे या संकटाची भीषणता दर्शवते.

प्रशासकीय आणि राजकीय पडसाद: भोंदूबाबांच्या वाढत्या प्रभावामुळे विधिमंडळातही तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुरोगामी महाराष्ट्रात अशा घटना घडणे ही ''राज्याच्या आत्म्याचा संघर्ष'' मानली जात आहे.महाराष्ट्र हा जादूटोणाविरोधी कायदा करणारे पहिले राज्य असूनही, या कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव ही चिंतेची बाब आहे.

राज्यात नाशिक मधील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण गाजत असतानाच नवी मुंबईतही तसाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे नवी मुंबईतील कळंबोली परिसरात अब्दुल रशीद रूप बाबाजान नावाच्या भोंदू बाबा ने काळी जादू काढून देण्याच्या पाहण्याने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याची उघड झाले आहे याप्रकरणी दोन महिलांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून या प्रकरणी भोंदू बाबा विरोधात पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर

वाळवा पुरोगामी तालुका म्हणून ओळखला जातो. लोक चळवळींना कायम तालुक्याने बळ दिले आहे. मात्र दुसऱ्या बाजूला भोंदूंच्या लीलाही वाढू लागल्या आहेत. लग्नाच्या समस्या, जुनाट आजारपण, आर्थिक समस्या, करणी, भूतबाधा, कौटुंबिक वाद आदी समस्या दूर करतो, असा विश्वास देऊन भोंदू दरबार भरवत आहेत. यासाठी वेगळी प्रचार यंत्रणा राबविली गेली आहे. समस्यांनी ग्रासलेली कुटुंबे भोंदूंकडे चकरा मारत आहेत. देवऋषीपणाच्या नावावर अंगारे, दोरा-गंडे देऊन पीडित कुटुंबांना गिऱ्हाईक बनवले जात आहे. त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहे. भोंदूंकडून महिलांना शरीरसुखाची मागणी झाल्याचेही प्रकार समोर आले आहेत. भूतबाधा, करणी काढण्यासाठी आर्थिक पॅकेज ठरवले जाते, तर कोंबडी, बोकडांच्या बळीसाठी भोंदूकडून अवाच्या सवा मागणी केल्याचे प्रकार समोर आले आहेत. वारणा पट्ट्यातील चिकुर्डे, ऐतवडे बुद्रुक येथील स्मशानभूमीत करणीचा अघोरी प्रकार केल्याचे समोर आले आहेत. चिकुर्डे येथील स्मशानभूमीत तर कापडामध्ये बाहुल्या, नारळ, लिंबू, मुलींचे फोटो व त्यामध्ये दाबण घुसवून ठेवल्याचे समोर आले होते. चिठ्ठ्यांमध्ये मुलींची नावे लिहिली होती.

तंत्र-मंत्र, गुप्तधन आणि संकटातून सुटका करण्याच्या नावाखाली भोंदू बाबा सामान्य लोकांची, विशेषतः महिलांची फसवणूक करत आहेत. निवडणुकांच्या काळातही अशा प्रकारच्या काळ्या लीलेत वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

फुले-शाहू-डॉ आंबेडकर यांचा वारसा केवळ नावाने न मिरवता, त्यांच्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हीच खऱ्या पुरोगामी महाराष्ट्राची ओळख असेल.

पुरोगामी विचार आणि अंधश्रद्धा यांच्यातील हा संघर्ष रोखण्यासाठी प्रशासकीय कठोरतेसोबतच सामाजिक मानसिकतेत बदल घडवणे गरजेचे आहे.

# महर्षी न्यायरत्न धुंडीराजशास्त्री विनोद यांच्या रेखाचित्राचे अनावरण



ज्योतिर्मय साहित्य

पुणे – महान तत्त्वज्ञ, विचारवंत, गूढवादी, योगी, स्वातंत्र्यसैनिक, लेखक आणि संत महर्षी न्यायरत्न धुंडीराजशास्त्री विनोद यांच्या रेखाचित्रकार मिलिंद रथकंठीवार यांनी रेखाटलेल्या चित्राचे अनावरण सोमवारी स.प. महाविद्यालया जवळील शांती मंदिर या विनोद त्यांच्या वास्तूमध्ये औपचारिक समारंभात झाले.

महर्षी विनोद यांचा उज्ज्वल अध्यात्मिक वारसा पुढे चालवणारे आत्मयोगगुरु यांच्या हस्ते रेखाचित्राचे अनावरण करण्यात आले. यावेळी मिलिंद रथकंठीवार, राष्ट्रीय बुद्धिबळपटू प्रकाश देशपांडे, माध्यम प्रतिनिधी विश्वास खोड आदी उपस्थित होते.

महर्षी न्यायरत्न धुंडीराज शास्त्री विनोद यांनी जागतिक शांती दूत म्हणून जगभर प्रवास केला. महर्षी विनोद हे डॉ अल्बर्ट आईन्स्टाईन, बर्ट्रांड रसेल, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, डॉ.राजेंद्र प्रसाद आणि भगतसिंग यांच्याशी जवळून संबंधित होते.

लेखक, गायक, रेखाचित्रकार आदी कलांमध्ये पारंगत व विविध पुरस्काराने सन्मानित मिलिंद रथकंठीवार यांचे वर्णन व्यक्ती एक अभिव्यक्ती अनेक असे केले जाते.

त्यांनी देश-विदेशातील प्रसिद्ध व्यक्तींची रेखाचित्रे रेखाटली आहेत. अटल बिहारी वाजपेयी, एपीजे अबुल कलाम, अमिताभ बच्चन, जयंत नारळीकर, रिचर्ड हेंडरसन, आर के लक्ष्मण, नरेंद्र मोदी, किशोर कुमार, आशा भोसले, लता मंगेशकर इत्यादी अनेक दिग्गजांचा त्यात समावेश आहे.

आजपर्यंत त्यांनी तीनशेहून अधिक रेखाचित्रे रेखाटली असून संबंधित व्यक्तींची किंवा त्यांच्या वंशजांची स्वाक्षरी घेऊन त्यांचा अनोखा संग्रह करून अनेक प्रदर्शने भरवलेली आहेत.

# गर्दीत हरवलेल्या सावल्या..!

ज्योतिर्मय साहित्य

प्रसारमाध्यमांद्वारे नजरेत आलेले एक चित्र कधी कधी काही चित्रे अगदी जवळची वाटतात. काही जुन्या आठवणी जुन्या वस्तू वास्तू त्याविषयीचे अशाच एका सुंदर व्हिडिओ आणि त्यातून सहज शब्द शब्दातून रेखाटलेले हे शब्दचित्र.



कधी काळी त्या कौलातून लवलवणारे पिवळे गवत, खड्डे खड्डे पडलेल्या त्या दगडी पायरीवर पडलेली ती पांढरी शुभ्र पारिजातकाची फुले कौलाच्या वळचणी खाली असणारी आयताकार छोट्या गजाची खिडकी आणि सकाळी सकाळी त्या खिडकीतून पडलेल्या त्या पारिजातकाच्या पानांची ती सावली सारवलेल्या त्या जमिनीवर पडायची. त्या पानांचे आणि फ ुलांचे काहीतरी नाते असावे असे नेहमी वाटायचे. त्याची दुसऱ्या दिवशीची उत्कटता वाट पहायला लावायची.आणि त्याच उत्कंठतेतून फुललेली ही विचार वेल

खिडकीतून डोकावणारा
तो एक सुंदरसा पारिजात,
भेटीला येई जणू उत्कंठेत
नातं एक त्याच आगळं मनात.

याच पडवी ला पन्हाळीतून पडणारे वळचणीचे पाणी पडून झालेला तो खड्डा आज स्मृतीत हरवल्या वेळी मनात येतो.




आणि ते थेंब आणि घरासमोर असलेल्या त्या झाडावरचे पावसाळ्यातील दव, वारा आला की ते मुठीत झेलताना झालेला तो आनंद आज इतक्या वर्षांनी ही चेहऱ्यावर येतो आणि सोबत स्मित हास्य देऊन जातो.

मौक्तिकतेतील ते मोती
ओंजळीत भरू किती,
अंगावर झेलताना त्याच्या
आनंदाची कशी करू गणती.

पावसाळ्यातल्या त्या थेंबाचे चे ते स्नेहर्णव उलगडताना घराच्या मागच्या अंगणात उतरलेला स्वयंपाक घराच्या लाकडी खिडकीतून आलेला समाधान चुलीतील तो धूर थोडा वळचणीच्या विसाव्याला तर उरलेला उंच आकाशात जाऊन त्याचे ढग बनायचे.आणि इतर ढगांबरोबर धावताना तो हाच असेल का ?असा प्रश्न मन विचारत रहायचे.

थंडी आणि उन्हाळ्याच्या त्या मधल्या दिवसांत चुलीच्या मागच्या खिडकीतून आलेला तो मंद प्रकाश खूप काही सांगायचा.चुलीला लागून असलेली ती घडवंची त्यामधील लाकडे तसेच बाजूला असलेले ते फडताळ, खोलीतील ती स्वच्छता सारे कसे आपलेसे होऊन मनात आठवण म्हणून अगदी रुतलेले अगदी मनाच्या काळीज कप्प्यात साठलेले असेच.प्रत्येकाची एक ठरलेली अशी जागा जणू ती माझीच अशी चुली मध्ये रसरसलेला तो आर आणि त्या आरावर टम्म फुगलेली ती भाकरी किती सुंदर ! अगदी अनाकलनीय असेच सारे जणू. माझेच असे काही तो मंद प्रकाश आणि वाड्याच्या अंगणात असलेली ती तुळस आणि त्याभोवती चाललेल्या त्या किलबिलाटचे आणि त्याचे एक अनोखे नाते किती सहज गुंफत जाते. भरलेल्या घराची ती जाणीव आज कुठेतरी गर्दीत हरवलेल्या सावल्यात हरवल्याची जाणीव होते. आणि डोळे ओलावते.त्यावरून

प्रकाश तो चिवचिवता
साफ सुथरा नि मंद
आपलेच सारे काही
देतो निगुतीतला आनंद,

थोडे डाव्या बाजूला वळावे तर तिथे दिसणारी ती भुसा वरची शेगडी तो चिमटा ती शेगडी भरताना सर्वात प्रथम शेगडीची जाळी खाली ठेवायची, आडव्या छिद्रात लावलेली ती पत्र्याची उरुळी मधली लोखंडी उरुळी ठेवून खाली थोडेफार लाकडाच्या बारीक बारीक चाराचुरा त्यावर एक थर लाकडी भुसा भरायचा त्यावर भुसा पटपट जळू नये म्हणून थोडा पाण्याचा शिंतोडा द्यायचा पुन्हा नव्याने एक थर, भरत पूर्ण शेगडी भरायची आणि दोन्ही पत्र्याची उरुळी अगदी हळूवार काढायची आणि मध्यभागी चांगल्या बारीक लाकडाने ती पेटवून ठेवायची. हळूहळू जळेल तसे त्यातील खालची जाळी हलवून राख कोळसे खाली भांड्यात पडायचे. तेच कोळसे पुन्हा एकदा वापरायचे.अगदी साधी रहाणी होती.पण सुखाची सावली एक वेगळाच आनंद देत होती.

शेजारच्या उभ्या खिडकीतून डोकावताना अंगणात घातलेले वळवण अन् त्या खाण्यासाठी उड्या मारत येणारी एखादी लंगडी कोंबडी मनाच्या कुतुहलात अडकून जाते.अन् मन धाव घेत माळ्यावर जात. माळा अशी एक जागा थोडक्यात आत्ताच्या भाषेत स्टोअर रूम पण तेव्हा असे नव्हते.तेंव्हा जुन्या घरातील तुळईवर घातलेल्या फळ्या आणि त्यावर असणाऱ्या कुरकुंड्या, करंडे, छोट्या मोठ्या मडक्याच्या उतरंडी त्यामध्ये असणारी ती पत्र्याची डबडी आणि इतर काही कधीतरी लागणाऱ्या अशा वस्तू त्या माळ्यावर निवांत विसावलेल्या असत.

त्यातल्या एक बोटवे बनविण्याची ती पाटी (फळी) आठवते. तिच्यावर असणाऱ्या त्या रेषा त्याच्या एका टोकाला असलेले ते गुळगुळीत लाकडी गोल त्याखाली असलेल्या पाचसहा रेषा आणि त्याखाली बोटवे वळणारे ते दोन हात तो बांगड्यांचा खळखळ आवाज आज उद्या आणि तेंव्हा मधला फरक किती सहजतेने पुढे येतो. आणि

धार पडली पडली बाई मी
बोटवे वळते बाई मी, बोटवे वळते
सखी माझी त्याला निगुतीने चाळते.
सखी माझी किती त्याला निगुतीने चाळते.

त्याच्यानंतर स्वयंपाकाच्या घरामधून कोनाड्याच्या खोलीत कोनाड्याच्या खोलीतून माजघरात. माजघरातल्या एका विशेष गोष्टींचे कौतुक वाटते.ते म्हणजे माजघरातल्या त्या खुंट्या, त्या खुंट्यां आजपर्यंत किती महत्वाच्या गोष्टींच्या त्या साक्षीदार असतील. काही गोष्टींना सहजतेने तर काही गोष्टींच्या मुळशी जाऊन हाताळले असेल. कधी लहान मुलांच्या ओरडण्याचा तर कधी तान्ह्या बाळाच्या रडण्याने भावूक झाल्या असतील ना! अशा अनेक गोष्टी आहेत.लिहिल तेवढे कमीच.

स्थितप्रज्ञ अशा त्या मनाच्या कुतुहलात एक जागा निर्माण करत स्वतःकडे लक्ष वेधून घेतात असे वाटयचे. सर्वांच्या जिव्हाळ्याची ही जागा किती सुंदर आणि खूप काही सांगणारी मनाला खूप भावते.राग, प्रेम, जिव्हाळा साऱ्यांना एका धाग्यात गुंफणारी जागा म्हणजे माजघर ही असे नाहीतरी हे तसे

वाद ,संवाद हे असे हे तसे
चालते सारे कसे इथे जर तर,
प्रेम माया जिव्हाळा यांना एकत्र
गुंफणारी जागा म्हणजे माजघर.

फडताळ पूर्वीच्या त्या दगडी सहा हात लांब असणाऱ्या भिंती आणि त्यामध्ये अर्ध्या भिंतीपर्यंत बसवलेले लाकडी कपाट त्याचे वेगवेगळे प्रकार ही पाहिले आहेत. आमच्या मोठी काकी त्याला भंडारी असा ही शब्द वापरायचा. भंडारी म्हणजे दार असलेली ती लाकडी दिवळी आणि स्वयंपाक घरात पण अशी भंडारी असायची त्याला फडताळ म्हटले जायचे. काही शब्दांमध्ये फरक अर्थ बदल असू शकतात. कारण कोसकोसावर बदलणारी आपली भाषा यामुळे काही शब्दांचे अर्थ बदल असू शकतात. आणि कोपऱ्यातल्या एखाद्या खोलीत ही काही महत्वाची कागदपत्रे ठेवण्यासाठी अशा कपाटाची रचना केलेली असायची. त्या फडताळ विषयी ही त्याच्या त्या लाकडी खिडकीतून येणारा प्रकाश त्या लाकडी पलंगावर बसून आठवलेले ते त्या प्रकाशाचे फडताळाचे अन् मागलदारला असलेला तो काळा कुळकुळीत अगदी गुळगुळीत शेवग्याच्या झाडाच्या बुंध्याला असलेला दगड आणि त्यावर पडलेली ती पांढरी पिवळी फुले या साऱ्यांचे एक विलक्षण असे नाते जुन्यातून नव्यात गुंफत जाते.

तो काळा कुळकुळीत कातळ
अन् प्रकाशाचे ते विलक्षण नाते
नव्या जुन्याची सांगड घालत
नव्याने पुन्हा गुंफत ते जाते.

(क्रमशः)






॥ज्योतिर्मय॥

गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.
शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.
सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.
त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणाची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




# जात्यावरच्या ओव्या......

बोल बोलून खरे
लोक झालेत देव
खर्याखोट्याची पारख
मनी करून ठेव ||५८०||

बोलणारे खरे
गेले मातीत मिळून
खोट्या चे झिलकरी
घेती खर्याला गळून ||५८१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १५-१६




ज्योतिर्मय साहित्य

मृत्यू पावलेल्या व्यक्तीबद्दल दुःख करीत बसताना आपल्यालाही एक दिवस त्याच वाटेने जायचे आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर मृत्यूची जाणीव आपल्याला कायमस्वरूपी असली पाहिजे. म्हणजे आज माझी प्रिय व्यक्ती मला सोडून गेली परंतु उद्या मला देखील त्याच मार्गाने जायचे आहे. हे लक्षात घेतले तर आपोआपच जगण्याची आसक्ती आणि इहलोकीचा लोभ कमी होतो. असे झाले म्हणजे व्यक्ती आपल्या कर्तव्यापासून च्युत होत नाही.

उपकार या हिंदी चित्रपटात अभिनेता प्राणच्या तोंडी जीवनाचं तत्त्वज्ञान सांगणारं एक फार सुंदर गाणं आहे. त्यात कवी म्हणतो,'' कस्मे वादे प्यार वफा सब बाते है, बातों का क्या ? कोई किसी का नही है, झूठे नाते है नातोंका का क्या ?''



गाडगे बाबा कीर्तन करीत असताना कोणीतरी त्यांना त्यांचा एकुलता एक मुलगा गोविंदा गेल्याची बातमी सांगितली. तेव्हा ते म्हणाले

किती मेले कोट्यानुकोटी
काय रडू एकासाठी ?

लोकमान्य टिळक केसरीचा अग्रलेख लिहित असताना त्यांना देखील आपला मुलगा वारल्याची बातमी कळाली. परंतु त्यांनी आपले दुःख बाजूला ठेवून अग्रलेख पूर्ण केला आणि दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणेच केसरीचा अंक निघाला. ही सगळी मंडळी महान असली तरी त्यांना दुःख झाले नसेल का ? निश्चितच झाले असणार. परंतु त्याचे रूपांतर त्यांनी शोकामध्ये होऊ दिले नाही आणि आपल्या कर्तव्य मार्गावर ते अग्रेसर राहिले. कारण त्यांना देखील पुढे आपणही त्याच मार्गाने कधीतरी जाणार आहोत याची जाणीव होती.


समर्थ असे सांगतात की अति शोक हा मोहातून निर्माण होतो. मोह म्हणजेच लोभ किंवा वासना. असे षडरिपूंचे मायाजाल आपल्याला जगण्यात किंवा ज्या अनंत अशा राघवाच्या मार्गावर आपल्याला चालायचे आहे त्यापासून परावृत्त करते. माणसाने त्यातून बाहेर पडले पाहिजे.

इच्छेतून वासना निर्माण होतात. वासनेतून काम किंवा षडरिपू निर्माण होतात. त्यात आपण अडकलो की जन्ममरणाच्या चक्रातून आपली सुटका नाही. आपण पुन्हा पुन्हा जन्म घेत राहतो आणि मृत्यू पावत राहतो. माणसाचे अंतिम ध्येय मोक्ष हेच आहे. म्हणूनच मरणाचा अति शोक न करता आपल्यालाही एक दिवस त्याच मार्गाने जायचे आहे हे लक्षात ठेवून आपले कर्तव्य करीत राहणे महत्त्वाचे आहे. **(क्रमशः)**






दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देहान्त निरूपण


ज्योतिर्मय साहित्य

सद्गुरू शरण गेल्यावर ते आपली काळजी वहाण्यास सदैव तत्पर असतात.एकदा का परमार्थाच्या मार्गाला लागला तर कितीही अडचणी आल्या तरी पैलतीरावर सुखरूप पोहचवण्याचे कार्य सद्गुरू करतात. आपण त्यांच्या विचारांवर गाढ श्रध्दा ठेवली पाहिजे. त्यांच्या विरुद्ध कोणतेही वाईट कर्म करू नये. एकदा का त्यांना शरण गेला तर शिष्याला अनेक प्रकारे सांभाळून परमार्थामध्ये लहानाचा मोठा करतात. त्याची आध्यात्मिक प्रगती करतात. त्याच्या तील अज्ञानत्व संपवून टाकतात व पूर्ण पुणे ज्ञानी बनवतात. सद्गुरू ची भक्ति ज्यांचे कडून होते ते धन्य होय. सदगुरूंच्या भक्ति मुळे साधक मोक्षास पात्र ठरतो. मनापासून ख-या श्रध्देने सद्गुरूंच्या पायाशी सतत नतमस्तक व्हावे.

देहबुद्धीचा त्याग करून, भगवंताचे अनुसंधान राखावे. शुध्द वातावरण व पवित्र आचरण ठेवावे देह मनाने सतत वृत्ती स्थिर ठेवावी.स्वत: सुधारण्यासाठी प्रयत्न करावा. विषयाची व लौकिकाची आस सोडावी. कोणाचेही मन न दुखवता सर्वांनी प्रेमाने आदराने वागावे, मनुष्य जन्माला आलो आहोत तर हा देह माझा !!असे न म्हणता परमार्थाचे साधन समजावे. सर्वांनी देवरूप होण्याचा प्रयत्न करावा. मनामध्ये सतत भगवंताची स्मृति आणि कर्तव्याच्या जागृतिची जाणिव ठेवावी.

।।जय जय रघुवीर समर्थ।।
।।श्रीराम जय राम जय जय राम।।
दशक सातवा समाप्त

# सगुणभक्ति



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ' मला सोने भेटवा ' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी ' कोण ' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ' मी ', त्याला पाहायला जंगलात जायला नको. ' माझेपण ' सोडावे म्हणजे ' मी ' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास.

सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वत: अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला 'सहजसमाधी' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ' राम सर्व करतो ' आणि ' राम माझा दाता आहे ' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच. नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.

# श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे.......

■ चतुर्थ स्कंद

पहिल्या 7 अध्यायात धर्म विचार आहे.धर्म ही फार व्यापक संकल्पना आहे.जो धारण करतो तो धर्म. धृ हा धातू आहे.जो लोकांना धारण करतो तो धर्म. पुण्यवान लोकांनी धारण केला तो धर्म.

तुकोबांनी कधी धर्माचे पालन केले नाही, तर ते जसे वागले त्याला धर्म म्हणतात.

धर्म याचा नेमका अर्थ कळत नसेल तर धर्म हा शब्द ज्याला जोडला आहे त्याचा विचार करा.शिक्षकाचा धर्म,विद्यार्थ्यांचा धर्म...

धर्म शब्द खूप व्यापक आहे.

या धर्माचा विचार व्हावा यासाठी सतीचे चरित्र आहे, ध्रुवाचे, वाणाचे चरित्र आहे.

सतीचे चरित्र. ती दक्षाची कन्या. जावयाचे सासऱ्याशी जमत नसे. दक्षाने यज्ञ ठरविला.साठी शिवास निमंत्रण दिले नाही. ती म्हणे माझे वडील मोठे आहेत त्यांना वेळ नसेल मिळाला. महादेव पत्नीच्या इच्छेनुसार दक्षाच्या यज्ञात गेले. दक्ष तिथे सभामंडपात आले. ते प्रजापती होते.सर्व जण उठून त्यांना मान देऊ लागले. पण शिव समाधिस्थ होते. त्यांनी दक्षाला मान दिला नाही.दक्षाने शिवास अपमानकारक बोलले त्यावेळी सती नवऱ्याचा अपमान झाला म्हणून चिडते.तिने वडिलास जाब विचारला. तिने क्रोधात स्वत:ला जाळून घेतले. सासरचा अपमान झालेला स्त्रीला कधीच आवडत नाही. भगवान शंकराला खूप वाईट वाटले.सति गेली यामुळे ते क्रोधित झाले.त्यांनी स्वत: पासून एक विशाल पुरुष निर्माण केला त्याचे नाव वीरभद्र. त्यांनी वीरभद्र यास यज्ञाचा विध्वंस कर असे सांगितले.या दरम्यान एकमेकास अनेक शाप दिल्या गेले.ब्रम्हदेव यज्ञ पूर्ण झाला नाही म्हणून भगवंताकडे गेले. त्यांनी प्रार्थना केली. दक्षाचे मस्तक उडविले गेले पुन्हा शेळीचे मुख लाऊन यज्ञ पूर्ण केला. क्रमश:......

# आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





## ♦वेताळ कथा २४ (वेताळ पंचविंशती)

एका राजाला सर्व सुखसुविधा असूनही आतून अस्वस्थता होती. त्याला वाटत होते की काहीतरी त्याला बांधून ठेवत आहे. तो एका महात्म्याकडे गेला. महात्म्यांनी विचारले "तू काय धरून ठेवले आहेस?"

राजा विचारात पडला. त्याला जाणवले – तो आपल्या अपेक्षा, भीती आणि ओळखीला धरून बसला आहे.त्याने हळूहळू त्या सोडायला सुरुवात केली.

हळूहळू त्याला आतून स्वातंत्र्य जाणवू लागले.

वेताळाने विचारले - राजा मुक्त कधी झाला?

राजा विक्रम म्हणाला - "जेव्हा त्याने धरून ठेवणे सोडले, तेव्हा तो मुक्त झाला."

राजाचे अतिशय समर्पक व सत्य उत्तर ऐकून वेताळ प्रसन्न झाला पण ठरल्याप्रमाणे तो झाडावर जाऊन लटकला.

मनाचा चोवीसावा स्तर (गूढ संबंध)

या कथेत "अंतर्मुक्ती " दिसते.

१: बंधन : विचार, भावना, अपेक्षा. २: ओळख : त्यांच्याशी स्वतःला जोडणे. ३: जाणीव : हे बंधन आहे हे समजणे. ४: सोडून देणे : हळूहळू मुक्त होणे.

अंतर्मुक्ती : स्वतःमध्ये स्थिर होणे. मी कोणत्या गोष्टी घट्ट धरून ठेवते? त्यांना सोडले तर काय होईल?

असा शांतपणे व विवेकाने विचार करता आला तर स्वसमाधान मिळेल , जे फक्त स्वतः वर अवलंबून असेल. इतरांचा विचार त्यात नसेल व कुणाशी तुलना ही नसेल.

"सोडून देण्यातच खरे स्वातंत्र्य आहे."

आपल्या बुद्धीच्या अगदी विरोधी निर्णय हा! कारण जी बुद्धी घेण्यात आनंद मानते तिला देण्यात आनंद आहे हे पटवावे लागते तेव्हाच आत्मानंद प्रगटतो.

भगवंत हृदयस्थ आहे 🙏




# डोक्याखाली उशी न घेण्याचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

झोपताना जास्तीत जास्त लोक डोक्याखाली उशी घेतात. काही लोकांना उशी शिवाय झोपच येत नाही. पण असं करणं आरोग्यासाठी नुकसानकारक असतं. डोक्याखाली उशी न घेता झोपल्याने शरीराला खूप फायदे मिळतात. आरोग्य चांगलं ठेवायचं असेल तर पुढील टिप्स नक्की फॉलो करा.

पाठीच्या कण्याला आराम : पाठीचा कणा फार आधी पासून दुखत असेल तर काही दिवस उशी न वापरता झोपून बघा. उशीचा वापर केल्याने मान आणि पाठीच्या कण्याचा तणाव वाढतो. त्यामुळे अनेकदा मानेचा त्रास व्हायला लागतो. त्यामुळे उशी न वापरणे हा चांगला पर्याय ठरू शकतो.

*त्वचेसंबंधी फायदा* : उशीचा सतत वापर केल्याने त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात. कारण उशीमुळे चेहऱ्यावर दबाव पडतो. जे उशीचा वापर करत नाहीत, त्यांना ही समस्या होत नाही. उशी न वापरल्याने पिंपल्स येण्याची समस्याही कमी होते. कारण उशीचे कव्हर नेहमी धुतले जात नाहीत, त्यामुळे त्यातील धुळ कण यांमुळे चेहऱ्यावर पिंपल्स येतात.

मानेचं दुखणं : जेव्हा आपण उशीचा वापर करतो तेव्हा आपल्या पाठीच्या कण्याची स्थिती बदलते. अशात सतत पाठीदुखीची समस्या होऊ लागते. तसेच उशी न वापरता झोपल्याने मान योग्य दिशेने राहते आणि यामुळे पाठदुखीची समस्या होण्याचाही धोका राहत नाही.

चांगली झोप लागते : उशी डोक्याखाली घेऊन झोपल्याने अनेकदा काहींना थकवा जावणतो. याचा अर्थ झोप चांगली आणि पुरेशी झोप होत नाही. जेव्हा एखादी व्यक्ती उशीचा वापर न करता झोपली तर चांगली झोप होऊ शकते. तसेच इतरही काही समस्या दूर होतात. झोप पूर्ण झाल्यवर नक्कीच फ्रेश वाटतं.

मानसिक आरोग्य : उशी बरोबर नसेल तर डिस्टर्ब स्लीपची समस्या होऊ शकते. उशीचा वापर करत नसाल तर चांगली झोप येऊ शकते. ज्यामुळे तुमचा सर्व थकवा दूर होतो, तणाव कमी होतो. अर्थातच तणाव आणि थकवा नसेल तर मानसिक आरोग्य चांगलं राहतं.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# मुल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करणे आवश्यक - अनिरुद्ध पंडित

## पिंपळे सौदागर येथील सकल हिंदू संमेलनात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – हिंदू समाजासमोर आज ज्या समस्या आहेत त्यांचे निराकरण करण्यासाठी आपल्या संस्कारातील शाश्वत जीवनमुल्यांची खऱ्याअर्थाने जोपासना करुन मुल्याधिष्ठीत समाजव्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे संघटक अनिरुद्ध पंडित यांनी केले. पिंपळे सौदागर येथील सकल हिंदू संमेलनात ते बोलत होते. यशदा गोविंद चौकाजवळील लिनीयर गार्डन परिसरात रविवार दि. ५ रोजी सायंकाळी त्यांच्या व्याख्यानाचे सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.




उपस्थितांना संबोधित करताना ते पुढे म्हणाले की, हिंदू म्हणून हिंदूंची ओळख पुसण्याचा भारताबाहेरील शक्ती काम करत आहे. या शक्ती नष्ट करण्यासाठी जाती भेद बाजुला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे.

परिसरातील नागरिकांचा उत्फुर्त सहभाग लाभलेल्या या कार्यक्रमात व्यासपीठावर भागवताचार्य आत्माराम महाराज शास्त्री , गुरुबक्षसिंग रात्रा , विजय कांबळे आणि संयोजक मिलिंद पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी आशिर्वचनपर विचार मांडताना आत्माराम महाराज यांनी मन, मस्तक , मेंदू आणि मणका पक्का करुन एकसंघ विचाराने हिंदुंनी मार्गक्रमण करण्याचे आवाहन केले. गुरुबक्षसिंग आणि विजय कांबळे यांनी यावेळी समयोचित विचार मांडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नृत्य, नाट्य, लाठी – काठीचे प्रात्यक्षिक आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौरभ कुलकर्णी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मिलिंद पाटील आणि सारंग कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपदा तारे आणि ॲड. सोनाली कामटेकर यांनी केले. क्रांतीचंद्र चटपल्लीवार यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे, नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, नगरसेविका अनिता काटे, मा. नगरसेविका निर्मलाताई कुटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक संदीप काटे, मुकुंद चव्हाण, संकेत कुटे, संदेश काटे, अक्षय वडनेरकर , अमित वडनेरकर, विराट हिंदू संमेलनाचे सचिव अभय बाविस्कर यांचा या संमेलनात विशेष सहभाग होता.

## व पु काळे यांच्या साहित्यामुळे एक पिढी घडली-डॉ. वि.ल. धारूरकर

ज्योतिर्मय साहित्य



पुणे : पु काळे यांच्या कथा कादंबऱ्यांचे लेखन दर्जेदार होते त्यांच्या साहित्यामुळे महाराष्ट्रातील वाचकांची एक पिढी घडून आली असे मत प्रसिद्ध साहित्यिक माजी कुलगुरू डॉ. वि.ल. धारूरकर यांनी व्यक्त केले.

ते बावधन मेरी गोल्ड परिसरात सावरकर प्रभात शाखेच्या साप्ताहिक बौद्धिक वर्गात बोलत होते.

व पु काळे यांचे साहित्य आणि जीवन कार्य या विषयावर बोलताना त्यांनी व. पु. काळे यांच्या समग्र साहित्य असा थोडक्यात परिचय करून दिला. आणि प्रामुख्याने पार्टनर या त्यांच्या कादंबरीची ठळक वैशिष्ट्ये सांगितली.

प्राध्यापक नरहर कुरुंदकर यांचा संदर्भ देऊन ते म्हणाले, जेव्हा एखादा लेखक तीन पिढ्यावर अधिराज गाजवतो तेव्हा त्याच्या साहित्याचे मूल्य हे श्रेष्ठ मानवी मूल्यावर आधारलेले असते. व पु काळे यांनी महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय लोकांच्या जीवनशैलीचे प्रतिबिंब आपल्या कथा व कादंबऱ्यातून उमटविले त्यामुळे पार्टनर सारखी त्यांची कादंबरी ही लोकप्रिय शिखरावर पोहोचली,

लेखक जेव्हा मध्यमवर्गीय जाणिवांचा चक्रव्यूह छेदतात आणि समग्र समाजाचा वेध घेतात तेव्हा ते अधिक यशस्वी होतात असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये सर्वश्री प्रमोद चिकटे श्रीविष्णू मिश्रा राजीव वाबळे तसेच श्री विकास टिकेकर श्री लिंबू वाले इत्यादीने भाग घेतला. डॉ. दिनकर उत्तरवार हे अध्यक्षस्थानी होते तर शेवटी श्री विकास करंदीकर यांनी सर्वांचे आभार मानले



## बालनाट्य स्पर्धेत शिंदेमळा शाळेचा तृतीय कृमांक

ज्योतिर्मय साहित्य


सातारा : स्व.यशवंतराव चव्हाण बालनाट्य स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेमळा यांनी खटाव तालुका स्तरावर तृतीय क्रमांक पटकावला पारंपारिक खेळांचे महत्त्व सांगणारी नाटिका शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सादर केली होती. मुले मोबाईलच्या आहारी कसे गेलेले आहेत त्याचे दुष्परिणाम व पारंपारिक खेळांचे महत्त्व शारीरिक व्यायामाचे महत्त्व सांगणारा नाटकातून संदेश या नाटकातून देण्यात आला होता शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता खिलारे मॅडम व सहशिक्षक श्री प्रकाश भोंगाळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांच्या या यशाबद्दल चितळी केंद्र समूहाचे केंद्रप्रमुख श्री रफिक मुलानी साहेब मोराळे गावचे सरपंच श्री संदीप शिंदे माजी ग्रामपंचायत सदस्या सौ प्रेमलाताई निकम शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सदाशिव शिंदे उपाध्यक्ष सौ सोनाली शिंदे याचबरोबर शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य पालक ग्रामस्थ यांच्याकडून शाळेच्या या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

## विदारक वास्तविकतेची अस्वस्थता : शंकर लोडे यांचा पुढे कसे होईल ?

ज्योतिर्मय साहित्य

शेती मातीशी घट्ट नाळ असणारा शेतकरी, संवेदनशील कवी, कलावंत, समाजभान असणारा संवेदनशील कवी अशा विविध पातळ्यांवरील शंकर लोडे यांचे जगणे अर्थपूर्ण झाले आहे. साहित्य नाट्य कला प्रांतात वावरणाऱ्या शंकर लोडे यांचा विदारक वास्तविकतेची अस्वस्थता प्रत्ययकारीपणे मांडणारा पुढे कसे होईल? हा काव्यसंग्रह स्तंभ प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित होतो आहे.

जीवनाशी प्रामाणिक राहून समाजातील वास्तवाकडे डोळसपणे पाहणाऱ्या या कवीला जे वास्तव दिसले, जाणवले, अनुभवले त्याचे प्रत्यंतर ''पुढे कसे होईल ?'' या काव्यसंग्रहातील ६७ कवितातून उमटले आहे. महापुरुषांच्या विचारांचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पुरोगामी महाराष्ट्रात जे विपरीत घडते आहे, ते पाहून हा कवी व्यथित होतो. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी शिकवण दिली त्या विसंगत वृत्ती इथल्या नराधमांकडून होते. अस्वच्छता, अंधश्रद्धा व्यभिचार, अन्याय, अत्याचार, स्वैराचार हे पाहून उद्विग्नपणे असे किती द्यावे दाखले संतांचे आणि




राष्ट्रपुरुषांचे. चालली संस्कृती रसातळाला आमचे डोके ठिकाणावर कधी यायचे ? प्रश्न उपस्थित करतो.

किंबहुना विकृतांचा वाढता उत्थानपणा, अरेरावी, अमानवीयता आणि त्यांचे समर्थन करणारे व पाठीशी घालणारे नेते यामुळे अनागोंदी माजत आहे.

समाजातील दारिद्र्य, अन्याय, अत्याचार, अनैतिकता, विकृती याला जबाबदार केवळ शासनालाच धरणे कितपत योग्य आहे ? असे कवीला वाटते. दुष्कृत्यास आळा घालण्यासाठी अन्यायाविरुद्ध सर्वसामान्य नागरिकांनी बंड करायला हवे.

तुम्ही आम्ही सारे आता एक झालं पाहिजे

आपला भाऊ असो वा काका गुन्हा करणाऱ्यांना ठेचूनच काढलं पाहिजे, अशा स्पष्ट शब्दात गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी केवळ शासनालाच जबाबदार न धरता लोकजागृतीनेच लोकांनी पुढाकार घेत अद्दल घडवली पाहिजे, असा आशय कवी व्यक्त करतात. भरदिवसा माणसांच्या होणाऱ्या हत्या, निष्पापांचे लचके तोडने, बलात्कार, वाढती गुन्हेगारीप्रवृत्ती,


प्रा. डॉ. राजकुमार मुसणे, गडचिरोली मो. 94236 39532

पैसेवाल्यांच्या साम्राज्यापुढे नतमस्तक होणारे अधिकारी, बेईमानीची दुनिया वाढत चाललेली आहे. विश्वास, प्रेम, शांतीचा काही जमाना राहिला नाही, हे सांगताना: पुढे कसं होईल सांगता येत नाही, कठीण झालं जगणं जगताही येत नाही''

नैराश्याबरोबरच जगण्यातील हतबलता आणि व्यवस्थेतील विसंगतीचे दर्शन कवीने घडविले आहे.

(क्रमशः)

## अंजली तागडे, विराग पाचपोर यांना राजाभाऊ नेने पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य



पुणे – साप्ताहिक विवेकचे माजी संपादक कै. राजाभाऊ नेने यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा या वर्षाचा राजाभाऊ नेने स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार विराग पाचपोर आणि विश्व संवाद केंद्रच्या संपादक अंजली तागडे यांना जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना दरवर्षी या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता चंचल स्मृती, वडाळा (मुंबई) येथे पार पडणार आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र प्रचार प्रमुख प्रमोद बापट यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील. स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि २५ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याच कार्यक्रमात पद्मश्री रमेश पतंगे लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. मुंबई महानगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक प्रतीक कर्पे आणि मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक प्राचार्य डॉ बळीराम गायकवाड यांच्या हस्ते हे पुस्तक प्रकाशित होईल. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विवेक पुस्तक विभागाचे व्यवस्थापक शीतल खोत यांनी केले आहे.

## एकांकिका
## मायेचा ओलावा



✍लेखक - अरुण वि.देशपांडे, पुणे, मोबाईल- 9850177342

आशय - आपल्या कौटुंबिक जीवनात नाते-संबंधांना फार मोठे भावनिक स्थान असते, आणि या नात्यांचे महत्व मोठे आहे. आजच्या आधुनिक जीवनशैलीत, वेगवान दिनक्रमात, आपली अनेक नाती आपण गमावून बसलो आहोत, ही जाणीव अधिक चिंता वाढवणारी आहे. या जाणिवेचा फटका मोठ्यांना जितका बसलाय, तितकाच फटका आपल्या घरातील बाल-कुमारांच्या भाव-विश्वाला बसला आहे.
विसंवादी नात्यांमुळे छोट्या फॅमिलीतही परिस्थिती काळजी करण्याइतकी बिकट होत चालली आहे.
हाच भावनिक आशय प्रस्तुतच्या एकांकिका लेखनात मांडण्याचा प्रयत्न केलाय. "मायेचा ओलावा नसलेली नाती" घरात किती कोरडेपणा आणते " हे या एकांकिकेत जाणवेल. या कथानकातील "कुमारवयीन बहीण-भावाला" नात्यातल्या "मायेचा ओलावा " कसा नि कधी जाणवतो, याचे महत्व नव्या पिढीला नक्कीच पटेल असे वाटते.
सादर आहे - एकांकिका-मायेचा ओलावा

■ यातील पात्र-योजना
१.नीलिमा -आई, २.राहुल - बाबा
(मध्यमवर्गीय-मध्यमवयीन नोकरी करणारे जोडपे ),
३.स्वानंदी -उर्फ दिदी - मोठी मुलगी - वयोगट-१२-१३ वर्ष, ८-९ वर्गात शिकणारी स्मार्ट, चुरचुरीत बोलणारी, स्वत:विषयी जागरूक असणारी, हट्टी, हेकेखोर, अशी ही मुलगी, आपल्या लहान भावाशी हिचे अजिबात पटत नाही.
४.शुभम -उर्फ-भाई - ८-९ वर्षांचा , ५-६ वी चा विदयार्थी, याला घरी, बाहेर-सारेजण भाई म्हणत असतात.
५. बाबा राहुलचे - आई- बाबा, दोघे जेष्ठ नागरिक
६. आबा, ७.आज्जी, ८. टिना- शेजारच्या फ्लॅट मध्ये रहाणारी ६-७ वर्षांची मुलगी आणि या सगळ्यांची फॅमिली फ्रेंड.
९. स्वप्नाली- वर्गमैत्रिण, स्वानंदीची फास्ट फ्रेंड..
१०.मृणाल- सोसायटीच्या दुसऱ्या बिल्डिंगमध्ये राहणारी वर्गमैत्रिण, पण स्वानंदीची नावडती मैत्रीण.
************************************
एकांकिका- मायेचा ओलावा-दृश्य-१
दृश्य- पाहिले-
(पडदा उघडतो -रंगमंचावर हॉलचे दृश्य)
वेळ सकाळची- तयारी शाळेची, ऑफिसची..
घाई-गडबडीची त्यामुळे- आई-बाबा, दीदी, भाई हे सगळेच आपापल्या घाईत, प्रत्येकजण वैतागलेल्या स्वरात एकमेकांशी बोलत आहेत-
(सगळ्यांच्या समोर उभी रहात आई ठामपणे बोलते आहे)
■ आई- हे पहा, मी पुन्हा एकदा सांगते, नीट ऐका,
(बाबा, दिदी, भाई एकाच स्वरात विचारतात- आता काय झालं ? नि म्हणतात- बरं सांगा, आम्ही नीट ऐकतो..)
■ आई- ज्याने-त्याने, प्रत्येकाने , ज्याची ,त्याची, कामे करत चला, घर नीटनेटके ठेवणे माझे एकटीचे काम नाही, त्यात तुमचा हातभार असला पाहिजे.
■ बाबा- हा महामंत्र तू शेकडो वेळा जपत असतेस, आपल्या या दिदीवर ,भाईवर त्याचा काही परिणाम होतोय का ?
■ दिदी- मला वेळ तरी असतो का ? आणि मला या घरकामात इंटरेस्टही नाही,
■ भाई- मी लहानपणापासून हा असा अशक्त, मेहनत होत नाही, मी प्रयत्न करतो, पण कमी पडतो, वाटल्यास विचारा आईला,
■ आई- हो रे भाई, तुझ्या बाबांना आणि या तुझ्या मोठ्या बहिणीला मात्र या आईची काही माया नाही येत.
■ दिदी- ए भाई, मी काही तुला माझी, म्हणजे आपली रूम आवरत जा, असे कधीच सांगत नाही, तुलाच जास्त हौस आहे, मी काय करू,
■ बाबा- हे बघा, माझे ऑफिस टेन्शन इतकं वाढत चाललंय की आता तुम्हालाच काय, मी माझ्यासाठी सुद्धा वेळ काढू शकत नाही, मी सपशेल माफी मागून मोकळा होतो.
पुढील उद्याच्या अंकात.....

## ✍ओळख साहित्यिकांची



### अर्चना ठाकरे मोरे, मूर्तिजापूर

अर्चना ठाकरे मोरे, या मराठी लेखिका आहेत. त्यांचे एम.ए.डी.एड. शिक्षण झाले आहे. 1996 पासून त्या प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. सध्या त्या पी.एम.श्री. स्वर्गीय रा. दुबे नगरपरिषद प्राथमिक सेमी इंग्लिश शाळा मूर्तिजापूर, जिल्हा अकोला येथे कर्तव्यावर आहेत. त्या शालेय जीवनापासूनच विविध पारितोषिक मिळवत आल्या आहेत, जसे भाषण स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, काल्पनिक लेखन स्पर्धा, डिश डेकोरेशन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इत्यादी. त्या उत्तम निवेदिका आहेत. नगरपरिषद मुर्तीजापुर येथील मोठमोठ्या कार्यक्रमांचे यशस्वी सूत्रसंचालन त्यांनी केले आहे.

ऑगस्ट 2025 मध्ये प्रकाशित झालेला त्यांचा "अनुभूती" कथासंग्रह फार कमी वेळात वाचकांपर्यंत पोहोचला. आणि विशेष म्हणजे या कथासंग्रहाला "राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार " सुद्धा प्राप्त झाला आहे. यासाठी त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांची आगामी "झुंज" ही कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर आहे. दैनिक लोकमत, ज्योतिर्मय, तसेच दैनिक अभिव्यक्ती सामर्थ्य या दैनिकांसाठी त्या लिहितात. अर्चना ठाकरे मोरे यांचे लेखन हे स्त्रीच्या समस्यांना वाचा फोडणारे आहे, मग ती समस्या कौटुंबिक असो सामाजिक असो की राजकीय असो! त्यांचे 1.शिक्षक व विद्यार्थ्यांचे बदलते नाते.
2.ऑनलाईन युगात बदल बदलत गेलेला शेजार धर्म 3.सक्षम नारी, आज आणि काल 4.चल ग सखी 5. माझ्या नजरेतील नवदुर्गा 6. प्रिय नववर्षास 7. मूल्यशिक्षण काळाची गरज, हे लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच "अदृश्य" ही भयकथा आणि "एक हात नसून कुटुंब पोसणारी दुर्गा" ही सत्यकथा तर 1. शिदोरी 2.नक्षत्रा 3. डिजिटल युगातील पालकत्वाची कसोटी 4. अम्मा 5. शेवट 6. संस्कार धारा ह्या कथा या दैनिकांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत.

शैक्षणिक कार्यासोबतच त्यांना समाजकार्याची सुद्धा आवड आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुभूती या पुस्तकातून प्राप्त झालेली रक्कम मुर्तीजापुर येथील मूकबधिर विद्यालयाला दान देत, मुलांना कपडे ठेवण्यासाठी कपाट आणि विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. परमपूज्य पिठाधिपती श्री जितेंद्रनाथ यांनी स्थापन केलेल्या 'विश्व मांगल्य सभेच्या' त्या सक्रिय सभासद आहेत. कुटुंबाचा आधार असलेल्या आईला विविध कार्यक्रमातून सक्षम बनविण्याचे म्हणजे स्त्री सक्षमीकरणाचे पवित्र कार्य ही समिती करते. या समितीमार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये अर्चना ठाकरे मोरे ह्या उस्फूर्तपणे सहभागी असतात.

लेखिका अर्चना ठाकरे मोरे ह्या श्रीनाथ बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा असून संस्थेअंतर्गत चालणाऱ्या शाळेचा, साईनाथ विद्यामंदिरचा त्यांनी अगदी पाच वर्षात कायापालट केला. तेथील गरीब विद्यार्थ्यांना एक रुपयाही फी न घेता शंभर टक्के मोफत शिक्षण त्यांची संस्था देत आहे. तसेच गरीब विद्यार्थ्यांना स्वखर्चातून शाळेसाठी ने-आण करण्यात येते. त्या उपक्रमशील शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. विद्यार्थ्यांमध्ये राहून त्यांच्याशी हितगुज करायला, त्यांना मदत करायला अर्चना मॅडमला आवडते. 2013 मध्ये प्रशासन अधिकारी श्री.गुजर साहेबांच्या हस्ते त्यांचा आदर्श शिक्षिका आणि उत्कृष्ट संचालनकर्ती म्हणून नगरपरिषद मुर्तीजापुर येथे सत्कार करण्यात आला, त्यांना सतत काहीतरी शिकण्याची आवड आहे. सध्या त्यांचे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात सेवांतर्गत बीएड सुरू आहे. भविष्यात पी.एच.डी करण्याचा त्यांचा मानस आहे. वाचन, लेखन आणि पर्यटन हे त्यांचे छंद आहेत. स्वयंपाकात विविध पदार्थ करण्याची त्यांना आवड आहे. लहानपणापासूनच त्यांना वडिलांनी गोष्टीची पुस्तके वाचता वाचता वाचनाची सवय लावली. समाज सेवा करण्याची प्रेरणा सुद्धा त्यांच्या वडिलांकडूनच मिळाली आहे. त्यांना लेखन करण्याची प्रेरणा त्यांची मैत्रीण भुवन गवाले यांच्याकडून मिळाली आहे. त्यामुळे लेखनाचे सर्व श्रेय त्या भुवनला देतात. आपल्या आयुष्यात मिळालेल्या यशाचे वाटेकरी त्या भुवन आणि वडिलांना समजतात.
त्यांच्या पुढील कार्यास खूपखूप शुभेच्छा 🌹🌹

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### ♦मुलासमोर आपण आदर्श का ठेवावे ??

आपल्या घरातील लहान मुलामुलीसमोर आपण आपली वर्तणूक चांगली का ठेवतो? याचे उत्तर प्रत्येकजण वेगवेगळे देईल, पण संस्कार व नितीमत्तेचे धडे तुम्हाला कुठे मिळतात, तर ते प्रथम आपल्या घरात, आई वडील व कुटुंबातून हे सर्व मान्य आहे. कारण विचार, कृती व मने समजून घेण्याचे ते वय असते. सदगूण व संस्कृती, संस्कार याचे बालकडू त्यांना मिळाले तर ते कुठेही मागे पडत नाही. शाळेत चांगले शिक्षण आपण का देतो, काय देतो, हे महत्त्वाचे! मुले प्रौढांचे वागणे व अनुकरण का शिकतात?? कारण ईतर लोकांशी त्यांचे पालक, आई वडील जसे वागतात तसेच ते वर्तन करतात. याचा अर्थ आपल्या वाईट वर्तनामुळे ते भविष्यात तसे करतील, व तसाच समाज निर्माण होईल म्हणून आपण सजग पाहिजे.
लहानपणापासूनच आपण इसापनीती, रामायण, महाभारत, थोर समाजसेवक, विर क्रांतीकारक, सावरकर, सानेगुरूजी का शिकवतो तर पुढे आपली पिढी, समाज व राष्ट्र सशक्त झाले पाहिजे, पटत ना, स्वातंत्र्याची ज्योत टिळक, गांधी, आगरकर यांच्या प्रयत्नांचे फळ होय. अनेक वीर व क्रांतीकारकानी आपले बलिदान दिले! म्हणून क्रमिक शिक्षणाबरोबरच निसर्ग आणि निरिक्षणात्मक शिक्षण घ्यावे. त्यामुळे ती सक्षम होतील, असे म्हटले तर वावगे होणार नाही!!
गुड डे, टेक केअर, पुन्हा ऊद्या भेटू..
वाचत राहा तरंग माणसा-माणसाचे.

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# चराचरात आहे राम...

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार,

मी आज एका वेगळ्या विषयावर तुमच्याशी संवाद साधणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील माणकेश्वर नावाचं एक ऐतिहासिक गाव आहे. अकराव्या शतकातील महादेवाचं हेमाडपंथी मंदिर व नवसाला पावणारी सटवाई ही गावाचं रक्षण करत आहे. अन् हे देवालय जसं गावाचं भूषण आहे तसंच प्रभूरामरायाची अकराव्या शतकातील राममूर्ति स्वत: अनेक स्थित्यंतरे झेलत भक्तांना आशीर्वाद देत उभी आहे.

या शिल्पामधून त्या काळातील धार्मिक श्रध्दा, कला व सामाजिक जीवन यांची माहिती मिळण्यास मदत होते. या मूर्ति पूजेसाठी तर आहेतच पण त्यांचं बरोबर इतिहास व संस्कृतीचे जतन करणारे महत्त्वाचे पुरावे ठरतात. मूर्तितील रामरायाची कोमल भावना शरिररचना, अंगावरील अलंकार, चेहऱ्यावरील भाव, सभोवती कोरलेले दशावतार, परिवार देवता हे सर्व पहाता शिल्पाकृती रेखाटताना शिल्पकाराने नुसती मूर्ति घडवली नाही तर धार्मिक भावनांशी असलेले नाते स्पष्ट केले आहे. आपल्या कडे प्रत्येक गावाला स्वत:ची अशी स्वतंत्र ओळख आहे. इतिहासाच्या पाऊलखूणा ही ओळख जपत आहे. बंधूभाव, एकमेकांना समजून घेऊन समता, सर्वसमावेशक जीवन पध्दतीने सर्वांगीण विकास केला तर ध्येय गाठता येतं हे गावाने दाखवून दिले आहे. आज गाव सर्वार्थाने सुजलाम सुफलाम आहे. शेती या पारंपरिक व्यवसायाला खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण करणारं गाव आहे असं मला तरी गावाकडे जाताना जाणवत होतं. चोहोबाजूंनी शेती, गोठ्यात जनावरं अन् सदैव कष्ट करणारे आमचे शेतकरी बांधव. गावाला धार्मिकतेचा वारसा लाभला आहे. त्या बरोबर कष्टाची किंमत आहे. कारण कडक उन्हाच्या काहिलीने तळपणारा तप्त सुर्यदेव असला तरी



त्याने गावाला मांगल्याचे वरदान दिले आहे.हे गावात प्रवेश करताच जाणवलं. जिकडे बघावे तिकडे हिरवगार रानशिवार जणूकाही आलेल्या भक्तांचं स्वागत करत आहेत,असं वाटत होतं. वेशीतुन प्रवेश केला की गावाची ओळख होते. अन् आपण मंदिरापर्यंत पोहचतो.राममूर्ति आपलं स्वागत करत आहे. असे वाटते.

भक्तांना वंदे जगद्गुरु अन् माणकेश्वरला आल्याचे आत्मिक समाधान मिळते. तज्ञांच्या मते ही अकराव्या शतकातील राममूर्ति आहे. अनेक पिढ्यांची साक्षीदार असलेली व प्रेम, माया, ममता, एकजूट यांची शिकवण म्हणजे ही राममूर्ती होय. आमचे पूर्वज आदरणीय श्रीमान नरहरदेव धर्माधिकारी यांनी रझाकाराच्या काळात या मूर्तीचं प्राणपणानं रक्षण केलं आहे. ती एका वाड्यात ठेवली की देवांची विटंबना होऊ नये आणि शत्रुला कळू ही नये की हे राममंदिर आहे.!!!

यासाठी त्यांच्या पत्नीने स्वतःचं मंगळसूत्र गहाण ठेवून हा जाज्वल ठेवा जपला आहे. पुढे इंग्रजी राजवटीत कलेक्टरांना मंदिर बांधण्यासाठी परवानगी मागितली पण मिळाली नाही. पण आता त्याचा जिर्णोध्दार झाला आहे. ही फार गौरवाची गोष्ट आहे. अशा या मंदिरात परिवार देवता स्थापन केल्या आहेत. त्यामध्ये गावचे भूषण असलेले बागायतदार आदरणीय श्री कुमार भाऊजी जोशी व संस्कृत पंडिता डॉक्टर रजूताई जोशी यांच्या सह सर्व आदरणीय सदस्यांनी लोकसहभागातून नव्याने स्थापन केलेल्या दत्तमंदिर व राम, लक्ष्मण सीतामाई यांच्या मूर्तिची प्राणप्रतिष्ठा श्री व सौ रामचंद्र वासुदेवराव जोशी व शुभांगी काळे, धर्माधिकारी दांपत्याने दिनांक २५/३/२०२६ रोजी केली.

वेदाचार्य श्री, लक्ष्मीकांत (बंडू देव) व मंदारजी धर्माधिकारी यांच्या अत्यंत खड्या आवाजातील वेदमंत्रांच्या उच्चारणामुळे वातावरणात मांगल्याचा प्रवेश झाला अन् सर्वत्र चैतन्याचा आभास झाला. प्रत्यक्ष भगवंत प्रगटले अशी मनाची स्थिती निर्माण झाली. प्रत्येक ऋचेत भगवंता पर्यन्त पोहचण्याचे सामर्थ्य अक्षरशः जाणवत होते. माझ्या आयुष्यातील प्राणप्रतिष्ठेचा सोहळा एवढ्या जवळून मी प्रथमच बघत होते. मंत्राब्धिराज युतिराजपुण्य त्रैलोक्यनाथ जनसेव्यनार्थ आनंद चित्त अखिलात्मतेज ।। शरणं प्रपद्ये ।। मन्त्रानुगम्यं महानिर्वितेज महत्प्रकाश महाशांतमूर्तिम् त्रैलोक्यचित्त अखिलात्मतेजस श्रीपाद राज शरणंप्रपद्ये ।। वेदांचा अभ्यास करताना निर्माण झालेली स्पंदने आज मी प्रत्यक्ष अनुभवत होते.. सेवाभावी वृत्तीने पवमान श्रीसुक्त




वेगवेगळ्या धार्मिक विधीसह प्राणप्रतिष्ठा सोहळा श्री रामाचा पाळणा महाआरती महाप्रसादाने संपन्न झाला.

सौ, डॉ. रजनीताई जोशी सारख्या धर्मपांडित्यात यश शिखर गाठलेल्या भुवनमातृका अशा पदवीला सार्थ असणाऱ्या आमच्या रजूताईनी अत्यंत शिस्तबध्द भक्तिभावाने हा सोहळा पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. त्यांची सर्व टीम यात भक्तिरसपूर्ण वातावरणात तत्पर सेवा देत होती. सर्व गावकरी अन् लहान मुलांपासून ते अबालवृद्धां पर्यन्त सर्वांचा आनंदाने सहभाग होता. आमचे आबामामा गोविंदराव कुलकर्णी (कुर्डुवाडी) सर्वात जेष्ठ व सर्वश्रेष्ठ तसेच गावातील सर्व आदरणीय व्यक्ती सर्व भक्त गण अत्यंत आत्मिक भावनेने रामरायाच्या चरणीं नतमस्तक होऊन आशीर्वाद घेत होते. भक्तिरसपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याचा एक भाग* होण्याचे भाग्य मला लाभले.

हा तर मी रामरायाचा आशीर्वाद समजते.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ.

# कर्तृत्वाची क्रांतीमय वाटचाल- सौ. क्रांती रसाळ-जाधव

**ज्योतिर्मय साहित्य**

कर्तृत्व उसणे मिळत नाही, तर ते निर्माण करावे लागते. वेळ, काळ आणि पुढ्यात असलेले अगणित प्रश्न प्रत्येकाच्या आयुष्यात असतात फक्त परिस्थितीनुसार ते बदलत असतात. आणि क्षेत्र कोणतेही असूदे त्यामध्ये आपली कामगिरी दिशादर्शक उंचावणारी असली की, ते क्षेत्र आपल्याला आवडू लागते आणि त्यातून आपण टप्प्याटप्प्याने पुढे जात असतो. पण काही वेळा त्या कामात आर्थिक मोबदला म्हणा किंवा पदसिद्ध अधिकार तात्पुरत्या स्वरूपात असले की ते काम, ती वाटचाल कंटाळवाणे वाटू लागते, कारण आपण मानसिक ताणतणावाच्या खाईत लोटले जाण्याची दाट शक्यता असते पण या गोष्टींना धैर्याने, संयमाने सामोरे गेलो, तर एक दिवस आपला नक्कीच असतो आणि हेच खरं असते.

अपुरे शिक्षण पुर्ण करून त्यातील खरा गमक शोधण्याची मनी बाळगलेली उर्मी तिला गप्प बसून देत नव्हती, एक सामाजिक जाण ठेवून त्या टप्प्यावर मास्टर ऑफ सोशल वर्कर मधून आपले शिक्षण पूर्ण करणारी आणि आपल्या ज्ञानातून सामाजाची सेवा होईल अशी नोकरी शोधून ''काम हाच कामाचा गुरू'' मानून त्या कामाला दर्जेदार आणि दिशादर्शक बनवले तर सेवाभावी नोकरीतून चांगली कामगिरी करता येईल आणि स्वतामध्ये ही



आमूलाग्र बदल घडवून स्वताला सिद्ध करत आपली ओळख कामातून झालीच पाहिजे तर ते आपण स्वीकारलेले काम योग्य ठरेल.

सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील भोसरे हे सासर आणि सातारा तालुक्यातील बोरखळ हे माहेर असणाऱ्या सौ.क्रांती जाधव नोकरी निमित्त पुणे येथे स्थायिक असले तरी कौटुंबिक जबाबदारी पार पाडत आपल्या नोकरीच्या व्यस्त वेळापत्रकात असताना सामाजिक जाणिवेतून लोकोपयोगी कार्य करताना अनेक चढ-उतार पाहिले आणि आपणही आपल्या टप्प्यावर समाज प्रबोधनाबरोबर प्रत्यक्ष समाजसेवा हाती घेतली तर आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा इतरांना जास्तीत जास्त कसा फायदा होईल यासाठी नेहमीच प्रयत्न करण्याचा मानस होता.

कामाचा वाढता ताण आणि मोजक्याच सुट्या यातून कशीबशी वाटचाल करत कामाला जरी आनंद मानला असला तरी वेळेपुढे सगळं कमीच.

अगदी कोरोना काळात सुद्धा त्या तसूभरही मागे सरल्या नाही तर एक पाऊल पुढे टाकत प्रत्येक माणसांपर्यंत पोहोचून जास्तीत जास्त सेवा देण्यासाठी प्रयत्नशील.

महिला बालविकास, महिला सक्षमीकरण, जनजागृती कार्यक्रम, महिला बचत गट बांधणी, महिला आरोग्य विषयक व्याख्याने व तपासणी (आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, ऍलोपॅथिक), आठरा वर्षे व त्यापुढील महिलांमध्ये होणारे शारिरीक बदल. आहार, योगासन कार्यक्रम. महिला सबलीकरण कार्यक्रम. युवक, युवती मेळावे. दिव्यांग मेळावा. वृक्षारोपण, जेष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम. दिवाळी बचत बाजार व विक्री. महिला दिन. सामुदायिक तुलसी विवाह. सामुदायिक सहल. शिवजयंती उत्सव. सामूहिक गोकुळ अष्टमी.

सेवेचे प्रयत्न जरी मोजके असले तरी सासरची कौटुंबिक जबाबदारी पेलताना माहेरची अनपेक्षितपणे पडलेली जबाबदारी अगदी आईवडिलांसाठी म्हातारपणाची काठी होऊनच जगावे लागणार, ही वेळ आल्यावर सुद्धा आपल्या व्यस्त वेळापत्रकामुळे कौटुंबिक वातावरण तितकेच आनंददायी ठेवण्यात त्या आज एक पाऊल पुढे आहेत,

म्हणूनच त्यांच्या कोरोना काळातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल झालेला सन्मान, तसेच नाशिक येथे राष्ट्रीय स्वयंसिद्ध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तसेच पलपब प्रकाशनाच्या सातारा अजिंक्य संमेलनात पलपब पुरस्काराने सन्मानित केले, याच कौतुकाला आणखी नवा आनंद देण्याच काम भोसरे ग्रामस्थांनी ही यथोचित सन्मानाने केले, म्हणूनच सौ.क्रांती यांची क्रांतीमय वाटचाल आजही सर्वांना प्रेरणादायी ठरत आहे.

✍
**दिपक पवार, चिंधवली**
**मो. 75883 82445**

# विनाशकाले विपरीत बुद्धि:

**ज्योतिर्मय साहित्य**

''जेव्हा एखाद्या व्यक्तीचा विनाश किंवा वाईट काळ जवळ येतो, तेव्हा त्याची बुद्धी भ्रष्ट होते आणि तो विवेकाचा मार्ग सोडून चुकीचे निर्णय घेऊ लागतो.''

विनाशाची प्रमुख पूर्वलक्षणे

१. विपरीत बुद्धी (चुकीचे निर्णय) : जेव्हा माणसाचा वाईट काळ येतो, तेव्हा त्याला हिताच्या गोष्टी किंवा योग्य सल्लाही कटू वाटू लागतो. ज्या निर्णयामुळे नुकसान होणार आहे, तेच निर्णय त्याला योग्य वाटू लागतात.

२. विवेकबुद्धीचा नाश : विनाशाच्या वेळी माणसाची सारासार विचार करण्याची शक्ती संपते. सत्य आणि असत्य, धर्म आणि अधर्म यातील फरक त्याला समजत नाही.

३. अहंकार आणि मूर्खपणा : व्यक्ती स्वतःलाच सर्वश्रेष्ठ समजू लागते. इतरांचे ऐकून घेण्याची वृत्ती नष्ट होते आणि तर्कसंगत गोष्टींकडे तो दुर्लक्ष करू लागतो. मी म्हणेन तीच पूर्व दिशा हा अट्टहास विनाशाकडे नेतो.




४. अधर्म आणि द्वेष : सज्जन व्यक्ती, शास्त्रे, वडीलधारी माणसं आणि दैवी




शक्तींबद्दल मनात द्वेष निर्माण होणे, ही विनाशाची मोठी लक्षणे आहेत.

५. स्वकीयांशी शत्रुत्व: आपल्या माणसांचा त्याग करून शत्रूंवर विश्वास ठेवणे किंवा ज्यांनी कठीण काळात साथ दिली त्यांच्याशीच कपटाने वागणे.

६. पाप कर्मात ओढ : मन सतत अशांत राहते आणि तामसी गुणांचा (आळस, मोह, क्रोध) प्रभाव वाढतो. वाईट कृत्य करताना भीती किंवा पश्चात्ताप वाटत नाही.

प्रसिद्ध श्लोक आणि अर्थ:

विनाशकाले विपरीत बुद्धिः।

मराठी अर्थ: जेव्हा विनाशाचा काळ येतो, तेव्हा बुद्धी उलटी (विपरीत) चालते.**(क्रमशः)**

# मृत्युपत्रामागची वेदना

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

वकीलांचा हट्ट पाहून त्यांनी आपला मनसुबा बदलला. मालमत्तेचे हस्तांतरण करण्याऐवजी मृत्युपत्र तयार करावे असा विचार केला आणि वकीलांकडे बसून त्यांनी एक कच्चे मृत्युपत्र तयार केले.

एके दिवशी एक वेगळाच प्रसंग घडला. त्याच्या लहान मुलाच्या घरी असताना, पहाटेच हिराचंद झोपेत असतानाच घराला बाहेरुन कुलुप लावून घरची मंडळी बाहेरगांव गेली. ती दुसऱ्या दिवशी सकाळीच परत आली. ते देवदर्शनाला गेले होते. परंतु आपल्या वडिलास घरात डांबून ठेऊन कसले देवदर्शन? ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. बेंगलोर येथे असलेली त्यांची नात चिमीलाही हे समजले. तिने आजोबांना बेंगलोरला बोलावले. नातीच्या आग्रहाखातर हिराचंद बेंगलोरला गेले. चारआठ दिवसाचा मुक्काम केला. हिराचंदची कानाची अडचण पाहून त्यांच्या नातीने एका चांगल्या डॉक्टरकडे उपचार करुन एक कानाची श्रवणयंत्र बसवून दिले. हिराचंदला आता चांगलेच ऐकायला येऊ लागले. स्वत:मध्ये गुरफटलेला माणूस आता मुक्त झाला. लगेच मुलांना फोन करुन ही आनंदाची बातमी दयावी असा विचार केला परंतु त्यापेक्षा परत जाऊन एक आश्चर्याचा धक्का दयाचा म्हणून त्यांनी फोनवर सांगण्याचा मोह आवरला.

थोडयाच दिवसानंतर हिराचंद परत आपल्या गांवी आला. आपल्या मोठया मुलांकडे येऊन थांबला. संध्याकाळच्या सत्रामध्ये जेवण केल्यानंतर आपण ही आनंदाची बातमी सांगण्याचा बेत केला. थोडासा आराम घेऊन त्यांनी आपली श्रवणयंत्राची मायक्रो मशीन काढली आणि आपल्या कानात घातली. शांत असलेल्या वातारवणाचा गोंगाट कानी येऊ लागला. अनेक वर्षापुर्वी या परिसरातील जो आवाज ऐकला नव्हता तो आवाज आज पुन्हा ऐकायला मिळत होता. तो आपल्या बेडरुममधून बाहेर पडुन घराच्या हॉलमध्ये येऊन बसला. त्याचवेळी मुलगा आणि सुनबाई यांच्यामध्ये मोठमोठयाने कांहीतरी बोलण्याचा आवाज एकू येत होता. घरात वडील आहेत हे त्यांना माहिती होते. ते हॉलमध्ये येऊन बसले आहेत हे सुध्दा माहिती होते. म्हणतात ना भिंतीलाही कान असतात, परंतु हिराचंदचे कानच भिंती झाल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या असण्याचेही कुणाला कांही वाटत नव्हते. त्यांना कांहीच ऐकु येत नसल्याने मोठमोठयाने दोघांमध्ये संवाद सुरु होता. सुनबाई म्हणत होत्या. आता मामाजीचे वय झाले आहे. त्यांना काय करायचे मालमत्ता त्यांच्या नावावर ठेऊन कुणी फसवण्यापेक्षा लवकर ती आपल्या नावावर करुन घेण्याची गरज आहे. कसेही करा, त्यांना गोड बोलून तेवढी मालमत्ता नावावर करुन घ्या. मुलगा सांगत होता. एकदम गडबड करु नये. वेळ पाहून आपण सर्वकांही ठिक करु. त्यातही सुनबाई म्हणाली. असंही म्हाताऱ्याचं आयुष्य राहीलच किती. आणि या गोष्टीवर दोघेही हसले. हा संवाद स्पष्टपणे हिरांचदनी ऐकला. काळजाला भेगा पडाव्यात अशा वेदना झाल्या. आपल्या आयुष्यावर एवढया असंवेदनशीलपणे सुनबाईने बोलावे




आणि आपल्या स्वत:च्या मुलाने त्यावर हसावे हे त्यांना सहनच नाही झाले. परंतु तो संवाद आपण ऐकला ही बाब आता स्पष्ट करायची नाही. हे ऐकण्यापेक्षा आपण बहिरे होते तेच बरे होते. असा संतापाचा विचार करुन हिराचंदनी ते श्रवणयंत्र काढून पुन्हा त्या डबीत बंद केले आणि एक शांत वातावरणात तो विचारमग्न झाला.

मुलगा आणि सुनबाई बाहेर आले. अगदी अगत्याने हिराचंदाची हाताच्या ईशाऱ्याने विचारपूस केली. एक कृतीम हास्य चेहऱ्यावर घेऊन त्यांनी चांगले असल्याचे दर्शविले. दुसऱ्या दिवशी सकाळीच पुन्हा तो वकीलाकडे गेला. त्या मृत्युपत्रातील मोठया मुलाचा हिस्सा पूर्णपणे बाजुला केला आणि छोटया मुलांच्या नावाचे कच्चे मृत्युपत्र बनविले. परंतु पुन्हा विचार आला, की आपण मोठया मुलांचा अनुभव घेतला. कदाचित लहान मुलगा सुध्दा आपल्याबद्दल असाच विचार करीत असतील तर. परंतु ही परिक्षा घ्यायलाच हवी म्हणून त्यांनी ते श्रवणयंत्र बसविल्याचे कुणाला न सांगताच बोलणे ऐकु लागला. रस्त्याने जाताना अनेक वाईट बोलण्याचे अनुभव ऐकावयास येऊ लागले. एखादया बहिऱ्या माणसांना पाहून लोक काय काय बोलतात याची प्रचिती हिराचंदाला येऊ लागली. जगाकडे पाण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलला. हे जग वाईट आहे याच



माधव सूर्यवंशी माकणीकर
मो. 95278 53953

निष्कर्षावर तो आला.

आपल्या दोन्ही मुलांची मते आणि त्यांच्या पत्नीची मते त्यांनी बऱ्याच वेळा ऐकली. तो उदास झाला. माणसाच्या आयुष्यात नाती हीच खरी संपत्ती मानली जाते. प्रेम, जिव्हाळा आणि विश्वास यावरच प्रत्येक कुटुंब उभं असतं. पण जेव्हा या नात्यांच्या आड स्वार्थ, अपेक्षा आणि लोभ दडलेला असतो, तेव्हा त्या नात्यांचं खरं रूप समोर येण्यासाठी कधी कधी एखाद्या छोट्याशा प्रसंगाची गरज असते. हिराचंद यांच्या आयुष्यात आलेलं श्रवणयंत्र हे फक्त ऐकण्याचं साधन नव्हतं, तर ते त्यांच्या आयुष्यातील नात्यांचं खरे चेहरे उघड करणारं माध्यम ठरलं. आपल्या दिर्घायुष्याऐवजी आपल्या मृत्युवर टपून बसलेली ही लोक पाहून तो अगदी दु:खी झाला. या सर्व गोष्टीची मनातील उकल फक्त त्यांचा मित्र वकील साहेबांकडे सांगु शकत होता. परंतु तो आता उदास झाला. अनेक लोक कोटयावधीच्या संपत्ती एखादया ट्रस्टला दान करतात याची उकल हिराचंदला होत होती. जेंव्हा नाते आपले नसतात तेंव्हा शिल्लक कांहीच उरत नाही. त्यामुळे अगदीच खुलेपणाने मृत्युपत्र करण्याचा त्यांनी मानस पक्का केला व त्यांनी अंतीम मृत्युपत्र तयार केले.

एके दिवशी त्यांनी वकील साहेबांच्या घरी दोन्ही मुलांना परिवारासह उपस्थित राहण्याची विनंती केली. मुले आणि सुना वकील साहेबांच्या घरी उपस्थित होत्या. वकील साहेब यांनी हिराचंदच्या मनाप्रमाणे तयार केलेले मृत्युपत्र वाचन करण्यासाठी हाती घेतले. परंतु मुले म्हणू लागली की नको जरी मृत्युपत्र केलेले असले तरी आजरोजी त्याचे वाचन करु नये. त्यावेळी हिराचंद उठले व ते आजच आणि आत्ताच वाचन केले जाईल असे ठणकावून सांगितले. मुलांमधील संवाद वडीलांनी ऐकला ही नवलाची गोष्ट मुलांना गोंधळात टाकली. परंतु हिराचंदनी ते मृत्युपत्र वकील मित्राच्या व अन्य एका साक्षीदाराच्या साक्षीने वाचायला सुरुवात केली.

जी कांही मालमत्ता हिराचंदच्या वडीलांकडून आली आहे ती तिन्ही मुलांना समान प्रमाणात वाटप करण्यात यावी. आणि जी कांही मालमत्ता हिराचंदने स्वत:च्या कष्टाने कमावलेली आहे ज्यामध्ये नव्या नगरातील व्यवसायिक जागा, शेती सर्वकांही त्यांची नात चिमी यांच्या नांवे वाटप करण्यात यावी. कसल्याही संवादातून नव्या चर्चेला वळण घेण्यापुर्वी हिराचंदनी आपली बॅंग घेतली आणि तो बेंगलोर येथे आपल्या नातीकडे राहण्यास निघून गेले.

आईवडील हे आधारस्तंभ की केवळ मालमत्तेचे साधन या विचार चक्रात तो दिवस घालवू लागला. संपत्ती कमावण्यापेक्षाही ती योग्य व्यक्तीच्या हाती जात नसेल तर त्या वेदना सर्वात मोठया. त्यांनी या वेदनेला मृत्युपत्राआधारे वाट करुन दिली होती. माणसांपुढे जेंव्हा स्वार्थ उभा राहतो त्यावेळी अशा विचार चक्राचा सुध्दा कांहीच उपयोग नसतो. चिमी म्हणाली. विचार सोडा, आनंदाने जगा, या जगाचा आनंद घ्या. त्या दिवसापासून हिराचंदच्या आयुष्यात एक नवे वळण आले आणि दिनचर्या बदलली.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559